# पुणे पोलिसांतर्फे हेल्मेट जागृतीसाठी दुचाकी रॅली

**पुणे** : हेल्मेटला सतत विरोध करणाऱ्या पुणेकरांमध्ये हेल्मेट जागृती व्हावी यासाठी रस्ता सुरक्षा अभियानाअंतर्गत विविधकार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून उद्या (रविवारी) सकाळी शहरात दुचाकी फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. या रॅलीत पुणेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन रश्मी शुक्ला यांनी केले आहे.

पुणे पोलीस वाहतूक विभागातर्फे २८ वे रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात आपण सुरक्षित तर कुटुंब सुरक्षित, रस्त्यावर सावध रहा या घोषवाक्याद्वारे जनजागृती करण्यात येत आहे. भव्य दुचाकी रॅलीत हेल्मेट घालून सुमारे एक हजार नागरिक, पोलीस आणि दुचाकी रायडर सहभागी होणार आहेत. यावेळी फिनोलेक्स आणि गल्फ ऑइल ल्युब्रिकंट्सतर्फे पोलिस अधिकाऱ्यांना हेल्मेट्स, आणि मास्कचे वाटप करण्यात येणार आहे. तब्बल १ हजार ६०० हेल्मेटचे वाटप होणार आहे. साधारण ३६ किलोमीटरची ही रॅली असेल.

शुक्ला म्हणाल्या, मी स्वतः हेल्मेटसाठी आग्रही असून, हेल्मेट न घातल्यास काय होऊ शकते, हे उदहारणासह पटवून दिले आहे. याबाबत नागरिकांना सक्ती न करता, प्रथम पोलीसांपासून सुरूवात केली आहे. पोलिसांना हेल्मेट बंधनकारक केले असून, त्यांच्यावरही कडक कारवाई करण्यात येत आहे.

सह आयुक्त सुनिल रामानंद, वाहतूक शाखेच्या उपायुक्त कल्पना बारवकर, फिनोलेक्स कंपनीच्या संचालिका रितू छाब्रिया, गल्फ कंपनीचे विनायक जोशी यावेळी उपस्थित होते.